**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

| VOL- IX | ISSUE- V | MAY | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# सत्ताधारी पक्षावर विरोधी पक्षाचे नियंत्रण -एक विश्लेषणात्मक अध्ययन

**प्रा.डॉ.संतोष गुणवंतराव पाटील,**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

**प्रस्तावना:-**

लोकशाहीमध्ये निवडणुकीला महत्वाचे स्थान असते. निवडणुका लढवण्यासाठी राजकीय पक्षाची आवश्यकता असते. निवडणुकीत ज्या पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त होते तो सत्ताधारी पक्ष असतो व ज्याला बहुमत प्राप्त झाले नाही तो विरोधी पक्ष असतो. लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाची भूमिका महत्वाची असते. सत्ताधारी पक्षावर नियंत्रण ठेवण्यासाठी, लोकांच्या समस्या दूर करण्यासाठी, अविश्वासाचा प्रस्ताव मांडण्यासाठी विरोधी पक्षाची आवश्यकता असते. लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष सरकारच्या जनविरोधी धोरणावर टीका करुन जनहिताच्या धोरणाचा पुरस्कार करतो.भारतात 1969 पासून विरोधी पक्ष नेत्यास मान्यता, दर्जा व अधिकार प्राप्त झाले. सरकारच्या स्वेच्छाचारी प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवून सरकारच्या एकाधिकारशाही वर अंकुश ठेवण्याचे काम विरोधी पक्ष करतो. सरकारवर नियंत्रण ठेवण्यासाठी विरोधी पक्षाकडून अनेक आयुधांचा वापर केला जातो.

**अभ्यासाचे महत्त्व :-**

1) लोकशाहीच्या यशासाठी विरोधी पक्षाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.
2) सदरील अभ्यासामुळे सरकारवर योग्य ते नियंत्रण प्रस्थापित होते.
3) सदरील अध्ययनामुळे संसदीय आयुधांची माहिती मिळते.
4) सरकारला जनहिताच्या दृष्टीने निर्णय घेण्यास भाग पाडता येते.
5) स्वेच्छाचारी शासन कारभार करणाऱ्यास लगाम घालण्यासाठी विरोधी पक्षाचे अध्ययन करणे महत्त्वाचे ठरते.
6) सरकार आणि जनता यांच्यातील मध्यस्त म्हणून विरोधी पक्षाची भूमिका महत्त्वाची ठरते.
7) विरोधी पक्षाच्या अध्ययनामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये जनजागृती निर्माण होते.

**पूर्व अभ्यासाचा आढावा :-**

भारतातील सत्ताधारी पक्षावर विरोधी पक्षाचे नियंत्रण या विषयाच्या अनुषंगाने अनेक अभ्यासकांनी संशोधन केले आहे. "महाराष्ट्राच्या राजकारणात विरोधी पक्षाची भूमिका:1990-2003" याविषयावर बाबासाहेब गणपतराव देशमुख यांनी 2007 मध्ये संशोधन केले आहे. "संसदीय प्रजातंत्र मे विपक्ष की भूमिका" या अनुषंगाने 1998 मध्ये डॉ. बसंतीलाल बाबेल यांनी अध्ययन केले आहे.

**अध्ययनाची उद्दिष्टे :-**

1)विरोधी पक्षाची ऐतिहासिक माहिती अभ्यासणे.
2)विरोधी पक्षाचा उदय व विकासाचा अभ्यास करणे.
3)विरोधी पक्ष संकल्पना समजून घेणे.
4) सरकारच्या एकाधिकारशाहीला आळा घालणे.
5)विरोधी पक्षाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
6) संसदीय आयुधांचा वापर कसा केला जातो त्याचा अभ्यास करणे.
7) सत्ताधारी पक्षावर विरोधी पक्षाचे नियंत्रण यांचा अभ्यास करणे.

**गृहितके :-**

1) लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्षावर विरोधी पक्षाचे नियंत्रण प्रस्थापित होते.
2) विरोधी पक्षाने संसदीय आयुधांचा वापर प्रभावीपणे केला आहे.

**संशोधन पद्धती:-**

सत्ताधारी पक्षावर विरोधी पक्षाचे नियंत्रण या विषयाचे अध्ययन करताना विरोधी पक्षाची माहिती संकलित करून तिचे विश्लेषण करण्यात आले आहे. विश्लेषण करताना ग्रंथालयीन साहित्याचा, वर्तमानपत्राचा व निवडक महत्वपूर्ण लेखांचा वापर करण्यात आलेला आहे.

भारतातील विरोधी पक्ष संसदीय आयुधांचा वापर करून सत्ताधारी पक्षावर नियंत्रण ठेवीत असतो. भारतीय संविधानातील कलम 105(1) व 107 ते 117 पर्यंत संसदीय आयुधांचा ची तरतूद करण्यात आलेली आहे. संसदीय आयुधांचा वापर विरोधी पक्ष करीत असतो. संसदीय आयुधांच्या वापरामुळे लोकशाहीचे संरक्षण होते व सत्ताधारी पक्षावर योग्य ते नियंत्रण प्रस्थापित होते. संसदीय आयुधांचा सविस्तर विचार पुढील प्रमाणे करता येईल

1)प्रश्नोत्तराचा तास:-

भारतात संसदेची वर्षातून साधारणतः तीन अधिवेशने बोलावली जातात.अधिवेशनामध्ये दोन्ही सभागृहाच्या कामकाजाची सुरुवात प्रश्नोत्तराच्या तासाने होते. कायदेमंडळात विचारले जाणारे प्रश्न हे तारांकित प्रश्न ,अल्पसूचना प्रश्न व अतारांकित प्रश्न या तीन प्रकारचे असतात. ही सर्व प्रश्न शक्यतो विरोधी पक्षाकडून विचारले जातात. लोकांच्या समस्या, सरकारचा गैरकारभार कशा प्रकारे चालला आहे याची माहिती लोकांना मिळते. विचारलेल्या प्रश्नाचे समाधान कारक उत्तर मिळाले नसल्यास विरोधी पक्ष सरकारला कोंडीत पकडतो.प्रश्नोत्तराच्या माध्यमातून लोकांच्या तक्रारी सरकारपर्यंत पोहोचविल्या जातात. प्रश्नोत्तराच्या तासा मधून सरकारचे दोष दिसून येतात. सरकारच्या मनमानी कारभाराला लगाम बसतो.

2)शून्य काळ:-

संसदेच्या दोन्ही सभागृहातील प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतरच्या कालावधीला शून्य काळ म्हणतात. सार्वजनिक दृष्ट्या महत्त्वाच्या प्रश्नांवर शून्य काळात चर्चा करता येते. अध्यक्ष शिवराज पाटील यांनी शून्य काळाचा कालावधी निश्चित केला. शून्य काळ बारा वाजेपासून तर भोजन अवकाशा पर्यंत असतो.शून्य काळात एक तास आधी पूर्व सूचना देवून विरोधी पक्षाचे सदस्य प्रश्न विचारून चर्चा घडवून आणतात. याकाळात जनहित व राष्ट्रहिताशी संबंधित अविलंबनीय प्रश्न विचारले जातात.

3)स्थगन प्रस्ताव:-

सभागृहाचे दैनंदिन कामकाज बाजूला ठेवून सार्वजनिक समस्यांवर चर्चा करण्यासाठी विरोधी पक्ष कडून स्थगन प्रस्ताव मांडला जातो.कार्यक्रम पत्रिकेत समाविष्ट नसलेल्या आणि सार्वजनिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण आणि तातडीच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी स्थगन प्रस्ताव मांडता येतो. स्थगन प्रस्तावाची सूचना सकाळी दहा वाजता सभापती देणे आवश्यक असते. 50 पेक्षा जास्त सदस्यांचा पाठिंबा असेल तरच प्रस्ताव मांडला परवानगी मिळते.

4)अविश्वास प्रस्ताव:-

लोकसभेचा मंत्रीमंडळावर म्हणजेच सरकारवर विश्वास नसेल तर अविश्वास प्रस्ताव शक्यतो विरोधी पक्षाकडून मांडला जातो.सरकारच्या पाठीशी पुरेसे संख्याबळ आहे किंवा नाही हे पडताळून पाहण्यासाठी अविश्वास प्रस्ताव मांडला जातो.

संविधानात अविश्वास प्रस्तावाचा विशिष्ट असा उल्लेख नाही. मात्र संविधानातील कलम ११८ नुसार सदन आपली प्रक्रिया तयार करू शकतो. लोकसभेच्या नियम १९८ नुसार सदस्य लोकसभा अध्यक्षांकडे सरकार विरुद्ध अविश्वासाचा प्रस्ताव मांडतात. यामुळे सरकारवर विरोधी पक्षाचे नियंत्रण प्रस्थापित होते.लोकसभेत आतापर्यंत २६ वेळा अविश्वास प्रस्ताव आले आहेत.पहिला अविश्वास प्रस्ताव १९६३ मध्ये भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याविरुद्ध जे बी कृपलानी यांनी सादर केला होता.

अविश्वास प्रस्ताव बहुमताने मंजूर झाल्यास मंत्रीमंडळ पदभ्रष्ट होते. भारतात आतापर्यंत तीन वेळा या पध्दतीने मंत्रीमंडळ बरखास्त झाले आहे.1990 मध्ये व्ही पी सिंग सरकार,1996 मध्ये वाजपेयी सरकार 1997 मध्ये एच डी देवेगौडा सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारविरुद्धही आंध्र प्रदेश मधील तेलगू देसम पक्षाने २० जुलै २०१८ रोजी अविश्वास प्रस्ताव सादर केला पण तो मंजूर झाला नाही.अविश्वास प्रस्तावाचे महत्व सरकार तरले किंवा पडले इतक्या पुरताच मर्यादित नाही. त्यावेळेस सरकारच्या बाजूने होणाऱ्या तसेच विरोधी पक्षातून होणाऱ्या चर्चा खूप महत्त्वाच्या ठरतात. यातून राजकीय पक्षांच्या भूमिका

जनतेसमोर येतात तसेच सरकारवर विरोधी पक्षाचे नियंत्रण प्रस्थापित होते.

5)लक्षवेधी सूचना:-

स्थगन प्रस्तावाची प्रक्रिया किचकट असल्यामुळे सार्वजनिक दृष्ट्या महत्वपुर्ण प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी लक्षवेधी सूचना मांडली जाते. लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सरकारी कामकाजावर टीका केली जाते.लक्षवेधी सूचना सकाळी दहा वाजता अध्यक्षाकडे जमा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी किंवा लक्षवेधी सूचना महत्वाची असेल तर त्याच दिवशी मंत्र्यांना निवेदन करण्याचा आदेश येतो.

संविधानाच्या कलम 101 नुसार एखाद्या महत्त्वाच्या विषयाकडे सभागृहांचे लक्ष वेधण्यासाठी लक्षवेधी सूचना या आयुधांचा वापर करून सरकारच्या कारभारावर ठपका ठेवण्याचे काम विरोधी पक्ष करतो. लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सरकारला ताबडतोब कारवाई करण्यास भाग पाडले जाते.लक्षवेधी सूचनेमुळे विरोधी पक्षाचे सत्ताधारी पक्षावर नियंत्रण प्रस्थापित होते. सरकारच्या बेजबाबदार कारभारावर लगाम बसतो.

6)अर्धा तास चर्चा:-

विरोधी पक्षाकडून अर्धा तास चर्चा या संसदीय आयुधांचा वापर करून सरकारच्या कारभारावर नियंत्रण ठेवले जाते.

सभागृहात पूर्वी उत्तर दिलेल्या प्रश्नाचे अधिक स्पष्टीकरण करण्यासाठी, उत्तराची कायदेशीर बाजू तपासण्यासाठी, सार्वजनिक समस्या दूर करण्यासाठी सविस्तर चर्चा होणे आवश्यक असते. त्यासाठी लोकसभेच्या नियम 92 नुसार अर्धातास चर्चेची सोय सदस्यांना उपस्थित करून दिलेली आहे. लोकसभेत आठवड्यातून तीन दिवस सोमवार, बुधवार आणि शुक्रवार बैठकीतील शेवटचा अर्धा तास आणि राज्यसभेत सभापती निश्चित केलेल्या दिवशी 5 ते 5:30 दरम्यान चर्चा केली जाते. चर्चेसाठी घेतलेला प्रश्न व्यापक जनहिताच्या संबंधित असावा. चर्चेचा आग्रह धरणाऱ्या सदस्यांनी कमीत कमी तीन दिवस आधी सूचना देणे आवश्यक असते.

7)अल्पकालीन चर्चा:-

स्थगन प्रस्ताव प्रत्येक वेळी मंजूर होत नाही त्यामुळे विरोधी पक्ष अल्पकालीन चर्चा या सारख्या वेगवेगळ्या आयुधांचा वापर करून सरकारच्या कारभारावर नियंत्रण ठेवत असतो.लोकसभेच्या नियम 97 अंतर्गत यांची तरतूद करण्यात आली आहे.

सार्वजनिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण प्रश्नावर सरकारचे लक्ष आकर्षित करण्यासाठी, देशात घडणाऱ्या आर्थिक व सामाजिक प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी, सरकारच्या कारभारावर चर्चा करण्यासाठी अल्पकालीन चर्चेची मागणी करता येते. सभापतींना सूचना दिल्यानंतर अल्पकालीन चर्चा घडवून आणण्यासाठी आठवड्यात दोन बैठकांचे आयोजन सभापती करतो.

8)निंदा प्रस्ताव:-

सरकारची नीती व कार्याची निंदा करण्यासाठी विरोधी पक्षाकडून निंदा प्रस्ताव मांडला जातो. हा प्रस्ताव वैयक्तिक मंत्री किंवा संपूर्ण मंत्रिमंडळाच्या कार्याविषयी रोष व्यक्त करण्यासाठी मांडला जातो. सभापतीच्या परवानगीने प्रस्ताव मांडता येतो.

या सारख्या अनेक आयुधांचा वापर करून सत्ताधारी पक्षावर विरोधी पक्षाचे नियंत्रण प्रस्थापित झाले आहे.विरोधी पक्षाच्या सतर्कतेमुळे सत्ताधारी पक्ष जनहिताच्या दृष्टीने निर्णय घेत आहे.भारतातील विरोधीपक्ष सतर्क असल्याने च अनेक वेळा योग्य वेळी सत्तापरिवर्तन झाले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:-**

1) सुभाष कश्यप, भारतीय राजनीति और संसद - विपक्ष की भूमिका, राजकमल प्रकाशन,नई दिल्ली,1998.
2) सुभाष काश्यप,हमारी संसद,नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नई दिल्ली, 2006.
3) बसंतीलाल बाबेल,संसदीय प्रजातंत्र में विपक्ष की भूमिका, राजस्थान हिंदी ग्रंथ अकादमी, जयपुर,1998.
4) पुखराज जैन, बी.एल.फडिया, भारतीय शासन एवं राजनीति, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा,2002.
5) राजेंद्र प्रसाद शुक्ल, प्रश्न काल हे शुन्य काल तक,राम प्रसाद अॅण्ड सन्स,आगरा, 2002.
6) सुनील शिंदे(संपा.), संसदीय लोकशाहीत विरोधी पक्ष स्थान आणि भूमिका, अरूणा प्रकाशन, लातूर,2013.
7)के.टी.गिरमे, विधानसभा परिचय आणि कामकाज,श्री.विद्या प्रकाशन,पुणे,1983.
8)चिं.ग.घांगरेकर, भारतीय राज्यघटना स्वरूप आणि राजकारण, मंगेश प्रकाशन नागपूर.